महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http://www.dmer.org

तातडीचे

क्र.संवैशिवसं/एमएच-सीईटी-२०१५/कु.डावरे/निवेदन/२०१७/१-अ, दिनांक - ०६/०६/२०१७

प्रति,
मा.अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण,
३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत,
खेरवाडी, अली यावर जंग,
वांद्रे, मुंबई ४०० ०५१.

प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
आवक क्र. 1868
दिनांक 17 JUN 2017

**विषय : कु.श्रृती माणिक डावरे यांनी प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे एमबीबीएस अभ्यासक्रमांच्या प्रवेशात झालेल्या अन्यायाची चौकशी करुन न्याय मिळवून देण्याबाबत केलेली तक्रार.**

**संदर्भ : आपले पत्र क्रमांक प्रनिप्रा/श्रुती डावरे/तक्रार/२६५, दिनांक ०६/०५/२०१७.**

विषयांकित प्रकरणी खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

१. कु.श्रृती डावरे यांनी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिताच्या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम प्रथम वर्ष परीक्षा घेण्याकरीताची एमएच-सीईटी-२०१५ या सामाईक प्रवेश परीक्षेस बसल्या होत्या. सदर परीक्षेमध्ये त्यांनी अनुसूचित जाती (एस.सी.) या मागासप्रवर्गातून संवैधानिक आरक्षणाची मागणी केली होती. सदर परीक्षेमध्ये कु.डावरे यांना २०० पैकी ११८ गुण प्राप्त झाले होते व त्यांचा राज्यस्तरीय गुणवत्ता यादी क्रमांक १८३०२ असा होता.

२. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत एमएच-सीईटी-२०१५ च्या गुणवत्ता यादी क्रमांकानुसार दिनांक १८ जून, २०१५ ते १८ जून, २०१५ या कालावधीत विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे पडताळणी आणि पसंतीक्रम अर्ज भरण्याची प्रक्रिया राबविण्यात आली होती. कु.डावरे यांनी सादर केलेल्या पसंतीक्रम अर्जानुसार एम.बी.बी.एस., बी.डी.एस., बी.ए.एम.एस. आणि बी.एच.एम.एस. या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरले होते. **(सहपत्र-१)**

३. कु.डावरे यांच्या गुणवत्ता यादी क्रमांकानुसार आणि पसंतीक्रम अर्जानुसार आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या द्वितीय निवड यादीमध्ये श्री.चंद्रकांत हरी केळुस्कर होमिओपेथीक वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग येथे प्रथम वर्ष बी.एच.एम.एस. अभ्यासक्रमाकरिता केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेतून निवड झाली होती. तदनंतर तृतीय निवड यादीमध्ये त्यांच्या गुणवत्ता यादी क्रमांकास त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार जागा उपलब्ध नसल्याने त्यांच्या निवडीमध्ये कोणताही बदल किंवा त्यांना त्यांची नव्याने निवड झाली नव्हती.

४. तदनंतर दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची चौथी निवड यादी प्रसिध्द करण्यात आली. परंतू सदर यादीमध्ये सुध्दा कु.डावरे यांना त्यांच्या गुणवत्ता क्रमांक आणि पसंतीक्रम अर्जानुसार कोणत्याही वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या शासकीय/खाजगी विनाअनुदानित अभ्यासक्रम निवड झाली नव्हती. चौथ्या फेरीनंतर

अनुसूचित जाती (एस.सी.) प्रवर्गातून तसेच महिलांकरिता आरक्षित जागांवर शेवटच्या गुणवत्ता क्रमांकावर रुजू झालेल्या महाविद्यालयांची आणि गुणवत्ता यादी क्रमांकाची माहिती खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रम | शासकीय/ खाजगी | गुणवत्ता यादी क्रमांक | एमएच-सीईटी गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे. | एमबीबीएस | शासकीय | ७२१६ | १४७ |
| २. | डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव | एमबीबीएस | खाजगी | ८४३९ | १४३ |
| ३. | नायर रुग्णालय व दंत महाविद्यालय, मुंबई | बीडीएस | महानगर पालिका | ९०७३ | १४१ |
| ४. | सिंहगड दंत महाविद्यालय, पुणे | बीडीएस | खाजगी | ९६२९ | १३९ |

५. उक्त तक्त्यावरुन असे दिसून येत आहे की, कु.श्रृती डावरे यांचा गुणवत्ता यादी क्रमांक १८३०२ (गुण - ११८) असा आहे व वरील तक्त्या नमूद केलेली शासकीय/खाजगी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाचे प्रवेश त्यांच्या गुणवत्ता यादी क्रमांकानुसार बऱ्याच वरच्या गुणवत्ता क्रमांकास प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे शासकीय/खाजगी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये केंद्रीभूत निवड प्रक्रियेनुसार त्यांना प्रवेश मिळणे शक्य नव्हते.

६. दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांमध्ये रिक्त असलेली वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांची यादी प्रसिध्द करण्यात आली होती. **(सहपत्र-२)** दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ च्या अधिसूचनेनुसार दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ नंतर खाजगी विनाअनुदानित एमबीबीएस व बीडीएस अभ्यासक्रमाच्या रिक्त रहाणाऱ्या जागा संस्थास्तरावर भरण्याची परवानगी देण्यात आली होती. **(सहपत्र-३)** सदर नोटीफिकेशन नुसार विद्यार्थ्यांनी ज्या महाविद्यालयात जागा रिक्त आहेत, अशा महाविद्यालयात व्यक्तीश: अर्ज सादर करणे आवश्यक होते. महाविद्यालयास्तरावर प्राप्त झालेल्या अर्जांची गुणवत्ता यादी तयार करुन त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.

७. कु.डावरे यांनी वर नमूद केल्यानुसार त्या त्या खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये व्यक्तीश: अर्ज सादर करणे आवश्यक होते.

८. कु.डावरे यांनी प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका (लॉ.) क्रमांक २९७६/२०१५ दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजी सदर याचिका निकाली काढली आहे. **(सहपत्र-४)**

याआधी कु.श्रृती डावरे यांच्या दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१५ च्या निवेदनास संचालनालयाच्या दिनांक २३/१२/२०१५ च्या पत्रानुसार माहिती देण्यात आलेली आहे. **(सहपत्र-५)** तसेच कु.डावरे यांनी निवेदनात नमूद केल्यानुसार सन २०१५-१६ मध्ये उपलब्ध असलेल्या जागांची माहिती आणि रिक्त राहीलेल्या जागांची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे. सदरची माहिती वैद्यकीय शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या निवड फेरीच्या आधारावर देण्यात येत आहे.

एम.बी.बी.एस.

| अ. क्र. | महाविद्यालय | एकूण महाविद्यालये | एकूण प्रवेश क्षमता | ऑल इंडिया कोटा /जीओआय व्यवस्थापन कोटा / अल्पसंख्यांक कोटा | प्रवेशित जागा | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शासकीय/ महानगरपालिका | २० | २७६० | ४३३ | २३२७ | ०० |
| २. | खाजगी | १० | ११२० | १६८ | ९१४ | ३८ |
| | **एकूण** | ३० | ३८८० | ६०१ | ३२४१ | ३८ |

बी.डी.एस.

| अ. क्र. | महाविद्यालय | एकूण महाविद्यालये | एकूण प्रवेश क्षमता | ऑल इंडिया कोटा /जीओआय व्यवस्थापन कोटा / अल्पसंख्यांक कोटा | प्रवेशित जागा | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शासकीय/ महानगरपालिका | ४ | २६० | ४१ | २१९ | ०० |
| २. | खाजगी | २ | २०० | ३० | १२२ | ४८ |
| | एकूण | ६ | ४६० | ७१ | ३४१ | ४८ |

उपरोक्त तक्त्यावरुन दिसून येत आहे की, कु.डावरे यांच्या तक्रारीत नमूद केलेली माहिती यामध्ये बराच फरक निदर्शनास येत आहे व सदरची महिती योग्य पध्दतीने तपासणी गेलेली नसावी.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत राबविण्यात येणारी प्रवेश प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शकपणे व विद्यार्थ्यांच्या गुणानुक्रमे राबविण्यात येतात. त्यामुळे कु.डावरे यांनी त्यांच्या तक्रारीत नमूद केलेले मुद्यांमध्ये तथ्य नाही. तरी सदरचे अभिप्राय प्राधिकरणास सविनय सादर.

संचालक,
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

प्रत -
मा. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, नवीन मंत्रालय, गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांना माहितीकरिता सादर.